नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - ३२८ | Issue - 328 | वार बुधवार दि. १६ एप्रिल २०२५ | Blow- Wednesday Date 16 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार

## हवामान खात्याचा अंदाज; तळपत्या उन्हाळ्यानंतरचा पावसाळा ठरणार दिलासादायक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय हवामान विभागाने यंदाच्या मान्सूनबाबत मोठी भविष्यवाणी केली आहे. तसेच हवामान विभागाने पुढील तीन महिने तापमानाचा पारा चढाच राहणार असल्याचे हवामान विभागाने सूचित केले आहे. तर पुढील चार महिने जोरदार पाऊस पडणार असल्याचेही सूचित करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाचे प्रमुख मृत्युंजय महापात्रा यांनी मंगळवारी यासंदर्भात पत्रकार परिषद घेत सविस्तर माहिती दिली आहे. 'एल निनोमुळे पावसावर परिणाम होण्याची शक्यता जवळजवळ नगण्य' असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

पत्रकारांशी संवाद साधताना महापात्रा म्हणाले, भारतात चार महिने (जून ते सप्टेंबर) मान्सूनचा हंगाम असतो. यावर्षी संपूर्ण हंगामात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, जो सरासरीपेक्षा अधिक असणार आहे. हवामान खात्याच्या अंदाजाचा हवाला देत महापात्रा म्हणाले, यावर्षी दीर्घकालीन पाऊस बरसण्याची शक्यता आहे. पाऊस सरासरी ८७ सेंटीमीटरच्या पुढे १०५ टक्क्यांहून अधिक असण्याची शक्यता आहे. त्यांनी असेही नमूद केले की, संपूर्ण भारतीय उपखंडात कुठेही एल निनोसारखी परिस्थिती निर्माण होत नाही. यामुळे यावर्षी पावसात कोणताही अडथळा येणार नाही. परंतु, त्यापूर्वी देशवासियांना तप्त उन्हाचा सामना करावा लागणार आहे.

आयएमडी प्रमुखांच्या माहितीनुसार, सध्या देशाच्या मोठ्या प्रदेशात उष्णतेच्या तीव्र झळा बसत आहेत. पुढील तीन महिन्यांत उष्णतेचा पारा आणखी वाढण्याचा अंदाज आहे. यातच अति उष्णतेमुळे पॉवर ग्रीडवर दबाव वाढण्याचीही शक्यता महापात्रांनी व्यक्त केली आहे. तीव्र उष्णतेमुळे जलाशयांमध्ये पाण्याची कमतरता राहणार पाणी टंचाईच्या झळा सोसाव्या लागू शकतात आणि अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थितीही निर्माण होऊ शकते, असाही अंदाज व्यक्त केला जात आबे. अशा परिस्थितीत, अधिक पावसाचा अंदाज मात्र बराच दिलासादायक ठरणार आहे. हवामान खात्याच्या मते, पाऊस केवळ कृषी



क्षेत्रासाठीच नाही तर शहरांसाठीही खूप महत्त्वाचा आहे.

# ईडीची सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरोधात दोषारोपपत्र दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नॅशनल हेराल्ड कथित भ्रष्टाचार प्रकरणात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरोधात ईडीकडून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. नुकताच ईडीने सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याशी संबंधित असोसिएटेज जर्नल्स लिमिटेड (गङ) या कंपनी संबंधित ७०० कोटींपेक्षा जास्त किमतीच्या मालमत्तेवर ताबा घेण्याची कारवाई केली होती. त्यानंतर आता हे दोषारोपपत्र दाखल



करण्यात आले आहे. संबंधित मालमत्तेत दिल्ली, मुंबई आणि लखनऊमधील प्रमुख मालमत्तांचा समावेश आहे, ज्यामध्ये राजधानी दिल्लीतील बहादुर शाह जफर मार्गावर स्थित प्रतिष्ठित हेराल्ड हाऊसचा देखील समावेश होते. परिणामी सोनिया गांधी आणि राहुल गांधी या मायलेकाच्या अडचणी वाढणार असल्याची चिन्हं आहेत.

ईडीचे म्हणणे आहे की, ही कारवाई मनी लॉन्ड्रिंग कायद्याअंतर्गत केली जात आहे. नॅशनल हेराल्ड हे एजेएलद्वारे प्रकाशित केले जाते. ही कंपनी यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीची आहे. सोनिया गांधी आणि राहुल गांधी दोघांचाही या कंपनीत ३८ टक्के भागिदारी आहे. यामुळे ते कंपनीचे सर्वात मोठे भागधारक आहेत.

ईडीने असेही नमूद केले की, ही कारवाई एजेएल मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाच्या चौकशीचा एक भाग आहे. मनी लॉड्रिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए), २००२च्या कलम ८ अंतर्गत ही चौकशी सुरू आहे. शिवाय, मनी लॉंडरिंग (जप्त किंवा गोठवलेल्या मालमत्तेचा ताबा) नियम, २०१३ च्या संबंधित तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत आहे. सदर आरोपपत्र एप्रिलमध्ये सादर करण्यात आले असून विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे. तर २५ एप्रिलला याप्रकरणी सुनावणी होणार आहे.

दरम्यान, सोनिया गांधी आणि राहुल गांधींसह सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांचेही नाव दोषारोपपत्रात जोडण्यात आले आहे. तर काँग्रेसकडून या कारवाईला 'राज्य पुरस्कृत गुन्हा' असे म्हणत जोरदार विरोध करण्यात आला आहे. नेते जयराम रमेश यांनी यासंदर्भात ट्विट केले आहे.

# राज्यभरात ८ लाख लाडक्या बहिणींना ५०० रुपयांचा हफ्ता मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील काही महिलांना १५०० रुपयांऐवजी केवळ ५०० रुपयांचा हफ्ता दिला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. यावरुन विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला. यानंतर आता राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी खुलासा केला आहे. दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार इतर कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ न घेणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपये दरमहा सन्मान निधी वितरित



करण्यात येत आहे. तसेच, इतर शासकीय योजनांचा १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेणाऱ्या महिलांना उर्वरित फरकाची रक्कम सन्मान निधी म्हणून वितरित करण्यात येत आहे, असं मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे.

त्याच शासन निर्णयाला अनुसरून नमो शेतकरी सन्मान योजनेचा दरमहा १००० रुपये लाभ घेत असलेल्या ७७४१४८ महिलांना उर्वरित फरकाचे ५०० रुपये सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे, असं स्पष्टीकरण आदिती तटकरे यांनी 'एक्स'वर पोस्ट करत दिलं आहे.

एकाही पात्र भगिनीस या योजनेतून वगळण्यात आले नसून, सदर प्रक्रियेत दिनांक ३ जुलै २०२४ नंतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याबाबतचे स्पष्टीकरण मी स्वतः विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले असून विधिमंडळाच्या कामकाजात त्याची नोंद आहे. तरीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत सातत्याने अपप्रचार करणाऱ्या विरोधकांचे एकतर प्रशासकीय आकलन कच्चे आहे, किंवा योजनेच्या दैदीप्यमान यशाने त्यांचे मनोबल खचले आहे. विरोधकांच्या या अपप्रचाराला माझ्या लाडक्या बहिणी बळी पडणार नाहीत ही मला खात्री आहे, असंही आदिती तटकरे म्हणाल्या आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी ठरलेल्या राज्यातील तब्बल ८ लाख महिलांना आता १५०० रुपयांऐवजी दर महिन्याला केवळ ५०० रुपयांचा हफ्ता मिळणार असल्याची माहिती मिळत आहे. या ८ लाख महिलांना नमो शेतकरी महासन्मान निधी मिळत असल्याने त्यांना आता १५०० रुपयांऐवजी केवळ ५०० रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. राज्य सरकारकडून करण्यात आलेल्या छाननीत ८ लाख लाडक्या बहिणींना नमो शेतकरी महासन्मान निधीची मदत मिळत असल्याचं समोर आलं. त्यामुळे या महिलांच्या आर्थिक मदतीत १००० रुपयांची कपात करण्यात येणार आहे. येत्या महिन्यापासूनच महिलांच्या हफ्त्यात कपात होणार आहे.

## 'ॲम्बी व्हॅली'वर ईडीकडून टाच; ७०७ एकर जमिनीवर कायदेशीर कारवाई

नवी दिल्ली : लोणावळ्याजवळील सहारा समूहाच्या 'ॲम्बी व्हॅली'तील ७०७ एकर जमिनीवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) टाच आणली आहे. जप्त करण्यात आलेल्या जमिनीची किंमत सुमारे दीड हजार कोटी रुपये आहे. 'मनी लॉंड्रिंग'च्या एका खटल्यात ही कारवाई करण्यात आल्याची माहिती 'ईडी'च्या अधिकाऱ्याने मंगळवारी दिली. सहारा समूहातील कंपन्यांकडून निधी वळवून बेनामी नावांनी या जमिनीची खरेदी करण्यात आली होती. त्यामुळे 'पीएमएलए' कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले. या वेळी सुमारे २.९८ कोटी रुपयांची कोणतेही विवरण नसणारी रोकडही जप्त करण्यात आल्याचे 'ईडी'कडून सांगण्यात आले आहे. हमारा इंडिया क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसासटी आणि इतरांविरोधात ओडिशा, बिहार आणि राजस्थान पोलिसांकडे फसवणूक आणि कट रचल्याप्रकरणी करण्यात आलेल्या तक्रारींच्या आधारे 'ईडी' कडून ही कारवाई करण्यात आली.

# मुंबई महानगरपालिका निवडणूक; शिंदे-राज भेटीने नव्या समीकरणाची नांदी?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणाला आता नवं वळण देणारी घडामोड सध्याच्या घडीला घडत आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेता एकनाथ शिंदे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानी जावून भेट घेतली आहे. एकनाथ शिंदे यांच्यासोबत त्यांचे विश्वासू नेते मंत्री उदय सामंत हे देखील शिवतीर्थ बंगल्यावर गेले आहेत. शिंदे आणि राज ठाकरे यांच्या भेटीचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. या व्हिडीओत राज ठाकरे एकनाथ शिंदे यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचं स्वागत करत आहेत. यावेळी मनसे नेते संदीप देशपांडे, अमेय खोपकर, अभिजीत पानसे, अमित ठाकरे हेदेखील उपस्थित आहेत. तसेच एकनाथ शिंदे यांच्यासोबत उदय सामंतदेखील व्हिडीओत दिसत आहेत.



काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जावून त्यांची भेट घेतली होती. तर दुसरीकडे शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी गेल्या काही दिवसांमध्ये दोन वेळा राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. उदय सामंत हे राज ठाकरे यांच्या भेटीमागे शासकीय कामकाजांचं कारण सांगत असले तरी त्या भेटीत राजकीय चर्चा झाली नसावी हे शक्यच नाही. एकनाथ शिंदे यांचा निरोप घेऊनच उदय सामंत राज ठाकरेंच्या भेटीला गेले असावेत, असा अंदाज आहे.

विशेष म्हणजे एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांच्या भेटीचा टायमिंग देखील महत्त्वाचा आहे. महायुती सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांना डावललं जात असल्यामुळे ते नाराज असल्याची चर्चा सातत्याने समोर येत आहे. एकनाथ शिंदे यांनी नुकतंच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे असणाऱ्या अर्थखात्याची तक्रार केल्याची देखील माहिती समोर येत होती. या सगळ्या घडामोडींदरम्यान आता एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांची भेट घडत आहे.

आगामी काळात राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. मुंबई महापालिकेची निवडणूक तर सर्वात जास्त महत्त्वाची आहे. या निवडणुकीत महायुतीत भाजपकडून जागावाटपात मित्रपक्षांना अपेक्षित जागा दिल्या जाऊ शकतात का? ते आगामी काळात स्पष्ट होईलच. पण शिवसेनेची अनेक वर्षांपासून मुंबईत सत्ता राहिलेली आहे. पण आता शिवसेना दोन गटात विभागली गेली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शिवसेनेची मुंबईत ताकद आहे. कारण विधानसभा निवडणुकीत ते बघायला मिळालं. त्यामुळे त्या ठाकरेंचा सामना करायचा असेल तर दुसरे राज ठाकरे आपल्यासोबत असतील तर त्याचा आपल्याला फायदा होईल, अशी रणनीती एकनाथ शिंदे यांची असू शकते. राज ठाकरे हे रोखठोक मतं मांडणारे नेते आहेत. ते त्यांच्या आक्रमक भाषणातून लाखो नागरिकांची मतं वळवू शकतात. याशिवाय राज ठाकरे सोबत असले तर भाजपवरही दबाव मिळवता येईल, अशी रणनीती एकनाथ शिंदे यांची असू शकते.

दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्यासोबत हातमिळवणी केली तर मनसेला देखील सत्तेत येण्याची संधी मिळेल. यामुळे पक्षाती ताकद साहजिक वाढेल. यामुळे एकनाथ शिंदे यांच्यासोबत राजकीय युती करणं हे राज ठाकरे यांच्यासाठी देखील फायदेशीर ठरु शकतं. त्यामुळे या भेटीत नव्या राजकीय समीकरणाचा जन्म होतो का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

एकनाथ शिंदे यांच्या भेटीपूर्वी मंत्री उदय सामंत हे राज ठाकरे यांच्या निवासस्थानाबाहेर दाखल झाले होते. त्यावेळी त्यांनी आपण वेगळ्या कार्यक्रमात होतो. आपल्याला अचानक फोन आला आणि आपण इथे आल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली. तसेच मनसे आणि शिवसेनेची युती झाली तर आपल्याल आनंदच होईल, असं सूचक वक्तव्य उदय सामंत यांनी केलं. विशेष म्हणजे एकनाथ शिंदे हे शिवतीर्थ निवासस्थानाबाहेर दाखल झाले तेव्हा उदय सामंत परत माध्यमांसमोर आले. राज ठाकरेंची भेट घेतल्यानंतर शिंदे प्रतिक्रिया देणार असल्याची माहिती त्यांनी दिली. आपण भेटीनंतर प्रतिक्रिया देणार हा एकनाथ शिंदे यांचाच मेसेज असल्याचं उदय सामंत यांनी सांगितलं. याचाच अर्थ ही सदिच्छा भेट नसून राज ठाकरे यांच्यासोबतच्या बैठकीत काय ठरलं त्या अनुषंगाने प्रतिक्रिया देण्यासाठीच एकनाथ शिंदे यांनी अशाप्रकारचा मेसेज पाठवल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

## मंदिरे समिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांची माहिती

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास चैत्री यात्रेत २ कोटी ५६ लाखाचे उत्पन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर दि.१५ :- चैत्री यात्रा कालावधीत भक्तांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी लाखो रुपयांचे दान केले तसेच सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले. मंदीर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, पुजा, फोटो विक्री आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून मंदिरे समितीस २ कोटी ५६ लाखाचे उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

चैत्री यात्रेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच परराज्यातून लाखोंच्या संख्येने भाविक आले होते. चैत्र शुध्द ०१ (दिनांक ३० मार्च) ते चैत्र शुध्द १५ (दिनांक १२ एप्रिल) या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ २५५९०९२ रुपये अर्पण, ६३९९७७९ रुपये देणगी, २६२१००० रुपये लाडू प्रसाद विक्री, ३४३४७०८ रुपये भक्तनिवास, २९२२१०० पुजेच्या माध्यमातून, ६४८५२०४ रुपये हुंडीपेटी, १६४७७४ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच फोटो, महावस्त्रे, शेणखत, गोमुत्र, मोबाईल लॉकर, जमा पावती, चंदन आदी माध्यमातून १०६८३९८ रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे.



मागील वर्षी २६१०३९६ रुपये देणगी, लाडूप्रसाद विक्रीतून १९०६०००, भक्तनिवास ७५२२९८ रुपये, २१००० रुपये पुजेच्या माध्यमातून, ४६८४१२४ रुपये हुंडीपेटीतून, ८९२५९ रुपयाचे सोने-चांदीचे दागिणे अर्पण, तसेच फोटो, महावस्त्रे, शेणखत, गोमुत्र, मोबाईल लॉकर, जमा पावती, चंदन आदी माध्यमातून २६१०७११ रुपये प्राप्त झाले होते.

तथापि, मागील वर्षी श्रींच्या गर्भगृहातील संवर्धनाचे काम सुरू असल्याने, दिनांक १५ ते २१ एप्रिल, २०२४ या चैत्री यात्रा कालावधीत पहाटे ५.०० ते रा.११.०० पर्यंत फक्त मुखदर्शन उपलब्ध करून देण्यात आले होते.

सन २०२४ च्या चैत्री यात्रेत रू. १२६७३७८८/- व या वर्षीच्या यात्रेत रू. २५६५५०५५/- इतके उत्पन्न प्राप्त असून, मागील यात्रेच्या तुलनेत रू.१२९८१२६७/- इतकी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या मिळालेल्या दानातून श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असेही यावेळी श्री श्रोत्री यांनी सांगीतले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज
बुधवार दि. १६ एप्रिल २०२५ २

## संपादकीय....

### नवे समीकरण

आगामी काळात राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. मुंबई महापालिकेची निवडणूक तर सर्वात जास्त महत्त्वाची आहे. या निवडणुकीत महायुतीत भाजपकडून जागावाटपात मित्रपक्षांना अपेक्षित जागा दिल्या जाऊ शकतात का? ते आगामी काळात स्पष्ट होईलच. पण शिवसेनेची अनेक वर्षांपासून मुंबईत सत्ता राहिलेली आहे. पण आता शिवसेना दोन गटात विभागली गेली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शिवसेनेची मुंबईत ताकद आहे. कारण विधानसभा निवडणुकीत ते बघायला मिळालं. त्यामुळे त्या ठाकरेंचा सामना करायचा असेल तर दुसरे राज ठाकरे आपल्यासोबत असतील तर त्याचा आपल्याला फायदा होईल, अशी रणनीती एकनाथ शिंदे यांची असू शकते. राज ठाकरे हे रोखठोक मतं मांडणारे नेते आहेत. ते त्यांच्या आक्रमक भाषणातून लाखो नागरिकांची मतं वळवू शकतात. याशिवाय राज ठाकरे सोबत असले तर भाजप-वरही दबाव मिळवता येईल, अशी रणनीती एकनाथ शिंदे यांची असू शकते. एकनाथ शिंदे यांच्या भेटीपूर्वी मंत्री उदय सामंत हे राज ठाकरे यांच्या निवासस्थानाबाहेर दाखल झाले होते. त्यावेळी त्यांनी आपण वेगळ्या कार्यक्रमात होतो. आपल्याला अचानक फोन आला आणि आपण इथे आल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली. तसेच मनसे आणि शिवसेनेची युती झाली तर आपल्याल आनंदच होईल, असं सूचक वक्तव्य उदय सामंत यांनी केलं होतं. दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्यासोबत हातमिळवणी केली तर मनसेला देखील सत्तेत येण्याची संधी मिळेल. यामुळे पक्षाती ताकद साहजिक वाढेल. यामुळे एकनाथ शिंदे यांच्यासोबत राजकीय युती करणं हे राज ठाकरे यांच्यासाठी देखील फायदेशीर ठरु शकतं. त्यामुळे या भेटीत नव्या राजकीय समीकरणाचा जन्म होतो का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# निसर्गाचा नियम,सर्व धर्माची समानता आणि संविधानातील तत्त्वांचे पालन केल्यास भारत विश्वगुरू बनणार : राष्ट्रीय संत पूज्य हवा मल्लिनाथ महाराज




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : निसर्गाचा नियम, सर्व धर्मची समानता आणि संविधानातील तत्त्वांचे पालन देशातील सर्व नागरिकांनी केल्यास भारत देश लवकर विश्व गुरू बनणार असल्याची प्रतिपादन जय भारत माता सेवा समितीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा म ल्लिनाथ महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मभूमी महू येथे केले.

राज्यघटनेचे शिल्पकारडॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जय भारत माता सेवा समितीच्या वतीने मध्यप्रदेश येथील इंदोर जिल्ह्यातील आंबेडकर जन्मभूमी महू येथे म ोठ्या जल्लोषात भीम जयंती साजरी करण्यात आला. याप्रसंगी जय भारत माता सेवा समि तीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराजानी भक्तांना उपदेश केले. यावेळी बाबासाहेबांच्या भव्य पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून दीप प्रज्वलित करण्यात आला. तसेच आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून संविधानाची शपथ घेऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आला. या कार्यक्रमात समितीचे राष्ट्रीय महिला अध्यक्षा तस्मिन पटेल, डॉ. हेमंतकुमार हिरोळे, सिद्धार्थ तलावरे, दासराव हमबरडे, वैजनाथ झलकी,संदेश पवार, मल्लिकार्जुन सारडा, पप्पू पाटील, नागराजा चिटगुप्पा, डॉ. निलंगे, नामदेव बबलाद, आकाश बागवान, कापूरेबाई नांदेड, गिरीश तंबाखे सोलापुर, रेवप्पा ममदापुरे, संतोष बोणे, प्रकाश चलगेरी, अनिल जाधव, शिवनाथ जाधव सह हजारो देशभक्त सहभागी झाले होते.या कार्यक्रमात सहभागी झालेल्या देशभरातील हजारों देशभक्तांना उत्तर कर्नाटक शैलीतील पुरण पोळी, खीर, रोटी, सांबार आणि इतर अनेक गोड खाद्यपदार्थ महाप्रस-ादचा आस्वाद घेऊन हजारो देशभक्तांनी जल्लोष साजरा केला.

समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते वैजनाथ झलकी यांनी सांगितले की, राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात देशातील लोकांमध्ये देश भक्ती व एकता मजबूत करणेसाठी म हाराष्ट्र, राजस्थान, उत्तरप्रदेश, कर्नाटक, तेलंगण, आंध्रप्रदेश सह भारतातून हज-ारो देशभक्त राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या नेतृत्वाखाली हजारो किलोमीटरच्या प्रवास करीत देशभक्तीपर यात्रेत सहभागी झाले होते. या प्रसंगी पूज्य श्री हवा मल्लिनाथ महाराज निरगुडी यांच्या अमृत हस्ते विविध क्षेत्रात यश मिळविणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

**देश सेवा हेच इश सेवा आहे. कोणीही जात, पात,धर्म,पक्ष यांच्या आधारावर लढू नये. आज प्रत्येकासाठी देश आणि राष्ट्रधर्म हा सर्वोच्च असला पाहिजे. सर्व धर्मांमध्ये समानता असली पाहिजे. देशाला होणाऱ्या त्रासातून बाहेर पडण्यासाठी सर्व भारतीयांनी एकरूप व्हावे, देशाची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा ठेवणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. सर्वांनी जाती-धर्मांच्या पलीकडे जाऊन देशाच्या भल्यासाठी झटले पाहिजे**

**- राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज, राष्ट्रीय अध्यक्ष जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली**

**राष्ट्रीय संत श्री हवा मल्लिनाथ महाराज स्वत:ला कोणत्याही मठापुरते मर्यादित न ठेवता संपूर्ण देश आपली मठ आहे असे समजून देश बळकट करण्याचे काम ते सतत करीत आहे. देशांची एकात्मता मजबूत होण्यासाठी संविधानिक कर्तव्याची जाणीव देशातील प्रत्येक नागरिकांना करून देण्यासाठी नेहमी देशभक्ती कार्यक्रमाची आयोजित करीत असतात.ते देशभर फिरून सशक्त देश व समाज घडविण्याचे काम करत आहेत.एक संन्याशी हवा मल्लिनाथ महाराज जय भारत माता सेवा समितीची स्थापना करून हातात तिरंगा झेंडा घेऊन भारत देशात देश भक्ती निर्माण करणारे हे दुर्मिळ देशभक्त राष्ट्रीय संत आहेत.**

**- सिद्धार्थ तलवारे सदस्य जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली**



# भिमाई आश्रमशाळेत भीमजयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर: (दि.१४) महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टच्या वतीने संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात प्राथमिक,माध्यमिक,उच्च म ाध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे आणि मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने भीमजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी तथागत गौतम बुद्ध ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म ाजी नगराध्यक्ष दिवंगत रत्नाकर मखरे यांच्या प्रतिमांना मा. डी. आर ओहोळ (राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय कर्मचारी संघ नवी दिल्ली), ड. राहुल मखरे (प्रवक्ता व प्रदेश सरचिटणीस,राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)म हाराष्ट्र राज्य, शकुंतला मखरे (अध्यक्षा,मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर) यांच्या हस्ते पुष्प / पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सामूहिक बुद्धवंदना करीत त्रिशरण,पंचशील घेण्यात आली.

यावेळी प्रश्नमंजुषासह विद्यार्थ्यांनी भाषणं देखील दर्जे दार केली.विविध कार्यक्रम भीमजयंतीदिनी प्रशालेत घेण्यात आले. प्रश्नमंजुषात प्रथम आलेल्या कु.अपेक्षा नगरे (८ वी) हिस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा असलेले चांदीचं नाणं ड.समीर मखरे यांनी भेट दिलं.

कार्यक्रमास संस्थेचे सचिव ड. समीर मखरे, संचालक गोरख तिकोटे, संजय कांबळे, अस्मिता मखरे, नानासाहेब चव्हाण तसेच विद्यार्थी, मुख्याध्यापक,प्राचार्य, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मिष्ठान्न देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नानासाहेब सानप यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने फाटे ट्रॅक्टर्स येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका कोर्टी येथे दिनांक १४ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष मा श्री नागेश पाटील यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व तसेच अटी ट्रॅक्टर समूहाचे तेथील कर्मचारी हेही उपस्थित होते.



# राष्ट्र जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान क्रांतिकारी होते : पत्रकार गौतम बाळशंकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, त्यांची सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक क्रांती, जगातील अत्यंत महत्त्वाची क्रांती समजली जाते. त्यामुळे राष्ट्र जडणघडणीमध्ये त्यांचे कार्य क्रांतिकारक ठरले आहे. जिथे मानवतावाद समता आणि बंधुत्व न्यायाची शिकवण दिली जाते. प्रस्थापित व्यवस्थेला जुगारून मानवतावादाचा स्वीकार केल्यामुळे. त्यांचा मार्ग बुद्धाचा यशस्वी ठरला आहे. म्हणून राष्ट्र जडणघडणीमध्ये त्यांचे योगद-ान क्रांतिकारकच होते असे प्रतिपादन प्रसिद्ध प्रबोधनकार पत्रकार गौतम बाळशंकर यांनी मौजे मुंडेवाडी येथील भीम जयंतीच्या व्याख्यानमालेच्या प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मुंडेवाडीकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीम ध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख,विश्वनाथ शिंदे सर, यांनी केले. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष, प्रकाश राजेंद्र शिंदे, उपाध्यक्ष चोखामेळा शिंदे, मारुती आप्पा मुंडेवाडी कर, अनिल शिंदे,आदी मान्यवर गावकरी म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नागरीकांना भारतीय संविधानाची प्रास्ताविक फ्रेम देउन केले सन्मानित**

# पडघ्यात महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती मोठ्या उत्साहाने १४ एप्रिल २०२५ रोजी पडघा केंद्रावर साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा ज्योतिबा फ ुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. तर कार्यक्रमाचे उद्घाटन शिवराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष अँड रोशन पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नाथा जाधव , श्रीधर जाधव,पडघा ग्रामपंचायत सरपंच रवींद्र विशे , माजी सरपंच शैलेश बिडवी, उपसभापती गुरुनाथ जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.



पडघा हे ऐतिहासिक गाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पडघ्यात आले होते. त्या आठवणींना उजाळा मिलिंद जाधव यांनी आपल्या प्रास्तविकेतून म ांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका जातीधर्माचे नसून सर्वांचे आहेत. डॉ. बाबासाहेबांचे विचार आत्मसात करायला हवेत तरच चळवळ अधिक गतिमान होईल. आपल्यापासून इतिहास लपवला गेला असून सत्य इतिहास शोधा. महाम नवांचे विचार सर्वजण एकत्र येऊन घराघरापर्यंत पोहचवूया असे यावेळी व्याख्याते अँड रोशन पाटील यांनी बोल-ताना सांगितले. यावेळी भिवंडी मनपाचे उपायुक्त शैलेश दोंदे, म.रा.मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी माजी सभापती अशोक शेरेकर, ग्रा. सदस्य शुध्दोधन जाधव, शशांक तांबोळी,ज्येष्ठ कवी सुनील पाटील, माजी सरपंच पराग पाटोळे, ग्रा. सदस्य योगेश पाटील तर आदी उपस्थित होते.यावेळी पडघा विभागातील सामाजिक कार्यकर्ते, पडघा पोलिस स्टेशन, ग्राम पंचायत सरपंच, सदस्य,पोलिस पाटील तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांना क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव २५ गावे पडघे विभागाच्या वतीने उप-स्थित नागरीकांना भारतीय संविधानाची प्रास्ताविका फ्रेम देउन सन्मानित करण्यात आले. तर यावेळी महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्याचा बॅनर्स लावण्यात आला होता. सायंकाळी सम तानगर येथून भव्य मिरवणुक काढण्यात आली होती. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याला पडघा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. फटाक्यांच्या आतिश बाजीने आणि महामानवांच्या जयघोषात पडघा विभाग दुमदुमले होते. नृत्य प्रशिक्षक रोहित पवार यांच्या मार्गर्शनाखाली ब्रीड्स ब्रेकर्स डान्स स्टुडिओ पडघा मधील मुलांनी नृत्य सादर करीत प्रेक्षकांचे मने जिंकली.

**सयुक्त जयंती करीता २५ गावे एकत्र**

मिरवणुकीत पडघा विभागातील विविध क्षेत्रातील नागरिक सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती म होत्सव पडघे विभागातील मिलिंद जाधव, सुरज भालेराव, विशाल सोष्टे, मयूर सोष्टे, सागर जाधव, यश कांबळे,राकेश जाधव , विशाल चव्हाण, अजय सोष्टे, वैभव सोष्टे, रोहित सोष्टे, आदेश जाधव ,दिनेश सोष्टे ,अनिकेत सोनावणे, शुभम भोईर या तरुणांनी मेहनत घेतली. तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.



# नूतन पदाधिकाऱ्यांचा डाळे गल्ली तालीम तरुण मंडळाच्यावतीने यथोचित सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर व्यापारी कमिटी चेअरमन, अध्यक्ष, उपाध्यक्ष, यांची २०२५ सालाची नवीन निवड झाल्याबद्दल दाळे गल्ली तालीम तरुण मंडळाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

श्री राहुल अशोक मामाने चेअरमन श्री महावीर दीपचंद फळे अध्यक्ष श्री सोमनाथ नरसोबा चव्हाण उपाध्यक्ष यांचा यशवंती सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित श्री किरण राज घाडगे, पंडित शेंबडे, म ारुती गेजे, दिनेश सगरे, उमेश शिंदे संजय चव्हाण शुभम आटकळे शशिकांत आटकळे रविराज घाडगे राहुल सगरे, सोमनाथ आटकळी धनंजय वाघ रामभाऊ महिमकर ज्ञानेश्वर चव्हाण शिवाजी चव्हाण ताळे गल्ली तरुण मित्र मंडळ कार्यकर्ते उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### तक्रारीची विचारणा केल्यावर दमदाटी करत मारहाण, गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) तक्रारीबाबत विचारले असता शिवीगाळ करत दमदाटी करून मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १० एप्रिल रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास किसान नगर अक्कलकोट रोड येथे घडली.याप्रकरणी आनंदय्या बसय्या स्वामी (वय-३२,रा.राजीव नगर) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून राजकुमार स्वामी (रा.किसान नगर)यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी याने फिर्यादी यांचा भाऊ गुरुपादया याच्याबरोबर झालेल्या तक्रारीबाबत विचारले असता वरील संशयित आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळ करत दमदाटी करून हाताने मारहाण केली.तसेच फिर्यादीच्या मालवाहतूक वाहनाची दगडाने काच फोडून नुकसान करत फिर्यादीच्या कानाला चावून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे तपास पोहेकॉ. नवले हे करीत आहेत.




# ‘आदिनाथ’च्या मागे मोहिते पाटलाचे मोठे अर्थकारण व राजकारण; सभासदांनी डोळसपणे निर्णय घ्यावा

## मा. आ. संजयमामा शिंदे यांचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या रणधुमाळीत प्रचारादरम्यान दोन्ही गटाकडून एकमेकावर आरोप करण्यात येत आहे त्यामुळे सभासद शेतकरी हे मात्र संभ्रमावस्थेत आहेत नेमका विश्वास कोणावर ठेवायचा असा गोंधळ निर्माण झालेला शेतकऱ्यांना आवाहन करताना माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी सभासदाने डोळसपणे निर्णय घ्यावा. कारखाना चालू करण्याची कुवत व क्षमता कोणाकडे आहे हे ओळखा आपले अनमोल मत कारखान्याची ऊर्जेत अवस्था प्राप्त करून देईल असे सांगताच आदिनाथ च्या निवडणुकीत पाठीमागे मोहिते पाटलाचे मोठे अर्थकारण व राजकारण असल्याची टीका शिंदे यांनी केली.



याविषयी बोलताना ती म्हणाली की विठ्ठलराव शिंदे, पांडुरंग सहकारी महर्षी आदिनाथ हे सर्व उजनीच्या पाण्यामुळे अस्तित्वात आलेले साखर कारखाने आहेत पण आज या सर्वांमध्ये फरक पडला आहे हे आपण सर्वजण पाहत आहोत मोहिते पाटलाच्या सहकार हा शिंदे व परिचारकांच्या कारखान्याच्या घरापेक्षा तीनशे रुपये कमी आहे त्यामुळे माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांचा ऊस घालण्याची लोकांची मनसिकता राहिलेली नाही. त्यामुळे त्या कारखान्याची गाळप सुद्धा दिवसेंदिवस कमी होत चाललेले आहे. त्यामुळे त्यांनी आता नवीन बाजारपेठ शोधण्याचे आहे

म्हणून आता त्यांनी करमाळा तालुक्यातील त्यांचा त्याला विद्यमान आमदाराला पुढे करून त्यांनी करमाळा आदिनाथ सहकारी साखर कारखाना ताब्यात घेण्याची मनसुबे आखली आहेत.

जेणेकरून आदिनाथ चालणारच नाही आणि चालू करण्याचा प्रयत्न झाला परंतु काळात होऊ शकले नाही तर आजिनाथ तर्फे सहकार महर्षी असा ऊस पाठवण्याचा विद्यमान आमदाराकडे टिपृगाळत करण्यासाठी साधे गुराळ सुद्धा नाही आणि मग कार्यकर्त्यांची ऊस घालण्यासाठी ते सहकार महर्षी द्या वळणीला आदिनाथ कारखाना बनतील मुळातच अडचणीत असलेला सरकार महर्षी कारखाना शेतकऱ्यांना प्रोत्सांची दर देऊ शकणार नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होईल आदिनाथ कारखान्याची निवडणूक दिसते तेवढी साधी सोपी सरळ नाही त्यामुळे फार मोठे राजकारण आणि अर्थकारण शिजत आहे मोहिते पाटलाकडून माढा पंढरपूर माळशिरस या तीन तालुक्याचे मध्ये गाढवाचा नांगर फिरवून झालेले आहे आता त्यांची वाकडी नगर करमाळ्यावर पडलेले आणि ही सर्व सेना आपल्या करमाळ्यावर गाढवाचा नांगर फिरवण्यासाठी सज्ज झालेले आहे त्यामुळे सभासदांनी सुज्ञ पणे विचार करून डोळस नेणे यावा असे आव्हान माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी केले आहे

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या डिजीटल मिडिया विभागाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी अहमेद शेख तर जिल्हा सरचिटणीसपदी एस. के. गायकवाड यांची निवड





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/एस. के. गायकवाड : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने डिजीटल मिडिया विभागासाठी विविध जिल्ह्यांमध्ये जिल्हाध्यक्ष आणि सरचिटणीस पदांवर नव्या नियुक्त्यांची घोषणा करण्यात आली असून धाराशिव जिल्हा अध्यक्ष पदी अहमेंद शेख तर जिल्हा सरचिटणीस पदी वागदरी ता.तुळजापूर येथिल पत्रकार एस.के. गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे.

नुकतच सांगली येथे पार पडलेल डिजीटल मेडिया विभागाच्या राज्यव्यापी आशिवेशनात महाराष्ट्रात पत्रकार संघाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ह्या निवडी जाहिर करण्यात आल्या असून राज्यभरातील सर्वच प्रमुख जिल्ह्यांचा यामध्ये समावेश आहे.

या प्रसंगी.महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष व जिल्हा सरचिटणीस पदाच्या निवडी जाहीर करण्यात आल्या असून त्या पुढील प्रमाणे धाराशिव जिल्हा अध्यक्षपदी अहमेद शेख संभाजीनगर – जावेद पटेल जालना – राहुल मुळे, लातूर – सुनिल कांबळे, परभणी – मोहम्मद सिद्दीकी, हिंगोली – उमेश चक्कर, नांदेड – सय्यद अब्दुल गफुर, जळगाव – आयाज मोहसीन, धुळे – सचिन पाटील, मुंबई – सुरेश पाटील, सातारा – अस्लम मुल्ला, अमरावती – सागर डोंगरे, सोलापूर – महेश गायकवाड (म्हाडा), अकोला – संजय दास, ठाणे – अमित जाधव, अहिल्यानगर – श्रीकांत जाधव (उत्तर), नंदुरबार – राजमल जैन, रायगड – अमोलकुमार जैन, रत्नागिरी – निसार शेख, पालघर – विकास पाटील, नाशिक – ज्ञानेश्वर तूपसुंदर, नागपूर – शरद नागदेवे, वैभव शहाणे, गडचिरोली – महेश गुंडेट्टीवार, भंडारा – मोहन राय, बुलढाणा – शौकत शहा, चंद्रपूर – राहुल थोरात, गोंदिया – रितेशकुमार अग्रवाल.

सिंधुदुर्ग – समिल दळवी, वर्धा – राहुल मून, वाशिम – संजय खडसे, यवतमाळ – सचिन जिथे, आदीची निवड जाहीर करव्यात आली.

तर धाराशिव जिल्हा सरचिटणीस पदी एस.के. गायकवाड, संभाजीनगर – सचिन गाडे, जालना – गणेश सातपुते लातूर – आनंद दवणे, परभणी – राहुल धबाले, हिंगोली – राम घोडेकर, नांदेड – वैजनाथ सोनटक्के, जळगाव – चेतन निंबोळकर, धुळे – गणेश पाटील, मुंबई – विष्णू बुरे, सातारा – कैलास थोरवडे, अमरावती – मनीष गुढदे, सोलापूर – राजेश जगताप, अकोला – सम्राट गायकवाड, अहिल्यानगर – विनोद गायकवाड (दक्षिण), नंदुरबार – नितीन सावळे, नाशिक – नितीन चव्हाण, नागपूर – अनिकेत उमरेडकर, गडचिरोली – श्रीधर दुगारापालटी, बुलढाणा – रवींद्र वाघ, चंद्रपूर – केवलसिंग जुनी, धाराशिव – एस. के. गायकवाड, सिंधुदुर्ग – कृष्णा सावंत, वर्धा – प्रशांत अवचट, वाशिम – संमय आंदुर्गे, आदींची निवड जाहीर करण्यात आली आहे. या नियुक्त्या पत्रकार संघटनांना डिजीटल युगात अधिक प्रभावीपणे कार्य करण्यास मदत करतील, असे विभागीय अध्यक्षांनी सांगितले. नवीन पदाधिकाऱ्यांना संघटनेच्या काम काजात यश मिळो,अशा शुभेच्छा ही देण्यात आल्या आहेत.या भव्य अधिवेशनाची सांगता जल्लोषात झाली. कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी अतिशय उत्कृष्टरीत्या करण्यात आल्याबद्दल राज्य संघटक संजय भोकरे आणि त्यांच्या कार्यकारिणीचे सर्वत्र कौतुक झाले. उपस्थित मान्यवरांनी संघटनेच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# रामलिंगेश्वर यात्रेस सोमवारपासून प्रारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री क्षेत्र तीर्थ ता द,सोलापूर येथील श्री प्रभु रामचंद्राच्या पदर्स्पर्शाने पावन झालेला तीर्थ येथील श्री रामलिंगेश्वर यात्रेस सोमवार पासून प्रारंभ झाला असुन विविध धार्मिक कार्यक्रम, पालखी व नंदनच्या मिरवणुक, दि,१५ एप्रिल रोजी कन्नड नाटक, कलमी तुक्याची गाणी व महाप्रसाद वाटप व शेवटच्या दिवशी दि १६ एप्रिल रोजी भव्य कुस्ती स्पर्धा यात्रा पंच कमिटी वतीने आयोजित केले आहेत .कुस्ती स्पर्धेत शेवटची कुस्ती कै.धानप्पा फताटे स्मृती श्रीराम केसरी किताब, रोख २५०० रुपये (पंचविशे रु ) अँड राजेंद्र फताटे यांचे वतीने ठेवण्यात आला आहे.

कुस्तीत विजय मल्लास अँड संजय गायकवाड मा.जि.प.सदस्य व प्रा.प्रभुलिगं वळसंगे यांचे हस्ते देण्यात येणार आहे.

तरी परिसरातील व जिल्ह्य़ातील मल्लानां कुस्ती स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटी चे पंच विश्वनाथ पावले, अहमद मुल्ला, क्रमप्राप्त पाटील, शेळगे गुरसिध्द कुर्लें कालिदास वळसंगे कल्याणी मेंथे कल्याणी फताटे, अँड. राजेंद्र फताटे यांनी केले आहे.

# पीकविम्याच्या मागणीसाठी ठाकरे शिवसेनेचा रास्ता रोको



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा :अमर जाधव

शेतकऱ्यांना पीकविमा द्यावा, शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव द्यावा आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्ती द्यावी या प्रमुख मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मंगळवारी लोदगा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी हे आंदोलन झाले.

गेली तीन वर्षे झाली, शेतकऱ्यांना पीकविमा मिळत नाही. आता काही शेतकऱ्यांना पीक विमा मिळाला आहे. बहुतांशी ९० टक्के शेतकरी पीकविम्यापासून वंचित आहेत. त्या सर्व शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.बैलगाडी, बैलासह एक तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले

या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विलास लंगर, उपतालुकाप्रमुख चंद्रकांत तळेगावे, सर्कल प्रमुख श्रीहरी काळे, स्वरुप डिग्रसे, ज्ञानेश्वर उजळंबे, हनमंत करळे, सुनील खंडागळे, विवेक जाधव, अजीत काळे, नेताजी भोईबार, नवनाथ लांडगे, सचिन उजळंबे, मुकेश पारवे, स्वरूप काळे राम मुकदम, धम्मपाल गायकवाड यांच्यासह शिवसैनिक व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# राष्ट्रीय सुरक्षित मातृत्व दिनानिमित्त स्तनदा व गरोदर मातांना बेबी किटचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व एकात्मिक बाल विकास नागरी प्रकल्प क्रमांक १ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सुरक्षित मातृत्व दिनानिमित्त जी. एम. चौक, बुधवार पेठ, थोरला राजवाडा येथील अंगणवाडी क्रमांक १११ मध्ये गरोदर व स्तनदा मातांना बेबी कीटचे वाटप व प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी अंगणवाडी सुपरवायझर शैलजा मगाई-धुमाळ, सोशल वर्कर मनीषा चव्हाण-वांगीकर, कल्पना गडगडे, परिचारिका सुकेशनी सोनकांबळे, आशा स्वयंसेविका संगीता शिरोळे, अंगणवाडी सेविका, मिराबाई इंगळे आदी उपस्थित होते.

सोशल वर्कर मनीषा चव्हाण-वांगीकर म्हणाल्या की, महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी आपणच घेतली पाहिजे, नियमित आरोग्य शिक्षण घेतले तरच आपण जागृत राहू. आता हम दो, हमारे दो पेक्षा हम दो हमारा एक हे अमलात आणले पाहिजे. महिलांवर जेवढे मातृत्व कमी लादू तेवढी महिलांच्या शरीराची झीज कमी होईल व सुरक्षित मातृत्व लाभेल.

समारोप करताना कल्पना गडगडे म्हणाल्या की, गरोदरपणात महिलांनी सकस आहार घ्यावा जमेल व झेपेल एवढा व्यायाम करावा, पुरेशी विश्रांती घ्यावी, वैयक्तिक स्वच्छता ठेवावी, नियमित तपासणी व लसीकरण करून घ्यावे, दवाखान्यात प्रसुती केल्यास व दोन मुलांमध्ये योग्य अंतर ठेवण्यासाठी कुटुंब नियोजन साधनांचा वापर केल्यास सुरक्षित मातृत्व प्राप्त होते.

कार्यक्रमाच्या शेवटी ३ गरोदर व स्तनदा मातांना बेबी किटचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मिराबाई इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन संगीता शिरोळे यांनी केले तर आभार सुकेशनी सोनकांबळे यांनी मानले.

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने संतोष सोमवंशी यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/अमर जाधव : महाविकास आघाडी चा घटकपक्ष उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हाप्रमुख तसेच महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ, पुणे चे उपसभापती संतोष सोमवंशी यांची औसा तालुका शेतकरी खरेदी विक्री संघाच्या सभापती पदी व उपसभापती पदी उजनी चे शिवसेना नेते शेखर अण्णा चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल लातूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांच्या हस्ते सत्कार समारंभ संपन्न झाला.



याप्रसंगी प्रतिकूल परिस्थितीत सामान्य कुटुंबातील एक युवक संतोष सोमवंशी यांनी सहकार क्षेत्रात आपले नाव कमी वेळात नावलौकिक केले आहे यांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे असे मत संजय शेटे यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी पक्षाचे लातूर तालुकाध्यक्ष बख्तावर बागवान, लातूर विधान सभा मतदार संघाचे अध्यक्ष धनंजय देशमुख, उद्योग व व्यापार विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद लोखंडे, कार्यालयीन जिल्हा जिल्हा सरचिटणीस पुरुषोत्तम पाटील, फ्रंटल सेल चे जिल्हा समन्वयक डी.उमाकांत, सफाई कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष जाकीर सय्यद, वाहतूक विभागाचे प्रदेश सरचिटणीस दिपक गवळी, ओबीसी विभागाचे लातूर तालुकाध्यक्ष पांडुरंग बेंबडे, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश सरचिटणीस समीर शेख, प्रा. अंकुश सुर्यवंशी, योगेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## तहसीलदार समशेर पठाण यांचे प्रतिपादन; व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम उत्साहात

# न्युनगंड मनातून काढून यशाच्या आकाशाला गवसणी घाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया : माणसाला मोठे व्हायचे असेल तर जिद्द, परिश्रम, ध्येय, संघर्ष, चिकाटी व यशाची वाट या बाबी अतिशय प्रामाणिकपणे हाताळून आपली वाटचाल करावी. माणसाचे यश येथूनच सुरू होते. कोणतेही काम काळजीपूर्वक व अभ्यासू वृत्तीने कराल तर यश तुमच्या पायासी लोटांगण घालणार आहे. म्हणून न्युनगंड मनातून काढून यशाच्या आकाशाला गवसणी घाला. असे प्रतिपादन गोदिंया तालुक्याचे तहसीलदार समशेर पठाण यांनी केले. ते व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.







यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मार्गदर्शक समशेर पठाण प्रामुख्याने उपस्थित होते.

समाज कल्याण विभागाचे उपक्रम सामाजिक समता सप्ताह व समता पर्व अतिशय सुंदर पध्दतीने साजरा करताना दिनांक ०८ एप्रिल पासून १४ पर्यंत सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. तेव्हा राष्ट्रपिता महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त व्यक्तिमत्त्व विकास मार्गदर्शन कार्यक्रम साजरा करीत असताना महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रम अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे पार पडला.

श्री. पठाण पुढे म्हणाले- स्वतः सिध्द करायचे असेल तर स्वतःच्या जगण्याचे वेळापत्रक तयार करा. स्वतःला वाहुन दया. तर यशस्वी होण्यासाठी कोणीही थांबवू शकत नाही. या निमित्ताने सर्व वर्गाचे भीमगीतावर नृत्य सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रदीप ढवळे यांनी केले तर आभार मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले. यशस्वीतेसाठी नीता भलमे, अस्मिता तेलंग, साधना पारधी, तुषार महाजन, अर्चना चव्हाण, कार्तिक शहारे, प्रगती खोब्रागडे स्वाती राणा आदींनी सहकार्य केले.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने मंत्री जयकुमार गोरे यांचा यथोचित सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने एसबीआय कॉलेज सांगली येथे भव्य डिजिटल मीडिया अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते व या कार्यक्रमात राज्याचे ग्रामविकास मंत्री होता सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. जयकुमार गोरे यांचा खोबऱ्याचा हार घालून विशेष सत्कार करण्यात आला हा गौरव महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजयजी भोकरे यांच्या हस्ते करण्यात आला व कार्यक्रमात संघाचे राज्य सरचिटणीस त्याचे दैनिक समर्थ गावकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे निवड समिती अध्यक्ष रुपेश मांडमुख. व तसेच पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, संतोष मोरे, रवींद्र कोळी, संजय ननवरे रामदास नागटिळक यांची प्रमुख उपस्थिती होती. या अधिवेशनात डिजिटल माध्यमांच्या वाढत्या महत्त्वावर आणि पत्रकारितेतील नव्या देशावर विचारमंथन करण्यात आले व उपस्थित मान्यवरांनी पत्रकार संघटनेच्या भूमिकेचे कौतुक करून भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी आमची जबाबदारी काय ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१४ एप्रिल २०२५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३४ वी जयंती दिवस. आंबेडकरप्रेमी यांच्यामध्ये कमालीचा उत्साह ओसंडून वाहत असतो. अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून बेभान झालेले असतात. यातून आंबेडकरांच्या व्यक्तिमत्व व तत्त्वज्ञानावर प्रचंड प्रेम दिसून येते. दीक्षाभूमी, चैत्यभूमी, जन्मभूमी, समताभूमी, इथे लोक विनम्र भावे अभिवादन करतात. बुद्धवंदना, मिरवणुका, वक्तृत्तृस्पर्धा, निबंधस्पर्धा, भाषणे, चर्चा, व्याख्याने, परिसंवाद यातून बाबासाहेबांना वैचारिक दृष्टीने आदरांजली केली जाते. डॉ. बाबासाहेबांच्या व्यासंगी आणि अभ्यासूवृत्तीला शाळा, कॉलेजे व विद्यापीठातून १४ तास अखंड अभ्यास माध्यमातून त्यांना अनेक विद्यार्थी आदरांजली वाहत असतात. आंबेडकर म्हणजे आधुनिक भारताच्या इतिहासाचे एक महान पर्व....!

समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मानवी मूल्यांचे एक सोनेरी पान आहे.... !

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला लोकशाही दिली, भारत देशाची राज्यघटना दिली, लोकशाही समाजवादी दिला, देशाचे समाजवादी धम्म दिला, नोकरी, शिक्षण व राजकारणात आरक्षण दिले, जहाल क्रांतीत तत्त्वज्ञान दिले. आपण सज्ञान झालो. परंतु आपले योगदान काय चळवळीसाठी आपण काय करतो ?

What is my contribution towards society ? what is my role ? what is my specific responsibility ?.... याचं चिंतन व्हायला हवे. दरवर्षी जयंती क्रमाने होत असते. म्हणून आपले व्हीजन काय ? आपला अजेंडा काय ? हे अधिक महत्त्वाचा आहे.

आज आंबेडकरी चळवळ कोणत्या दिशेला जात आहे? ही चळवळ डॉक्टर बाबासाहेबांचे क्रांतीकारक बोट ज्या दिशेला निर्देश करीत आहे त्याच दिशेला जात आहे की बोटाच्या विरुद्ध दिशेला जात आहे.... आज सर्वांचा रक्तदाब काय... आंबेडकरी अनुयांचा वारसा धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण करण्याचा आहे. ती आज वस्तुस्थिती आहे काय? आज आम्हाला ऊनी पुरी साडेसहा दशके झाली. आज आम्ही बुद्धाना आणि बाबासाहेबांना फसवत आहेत. त्यांचे विचारांना बगल देत आहोत. त्यांना ठकवित आहोत. आज आपल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वांग्मयीन आणि वैचारिक जीवनाच्या संवेदना जर तपासल्या तर मग भांबावून जाईल इतके आपण धम्मापासून आणि आंबेडकरवादापासून दूर गेलो आहोत. याची प्रचिती आपणास येईल. या जयंतीनिमित्त आपणास अंतर्मुख होण्याची गरज आहे. काय करत आहोत आपण.

मुळातच आपण बौद्धधम्मीय आहोत काय ? आंबेडकरवादी मूल्याचा टेस्टर लावण्याची गरज आहे. डॉ. आंबेडकर आणि अंधश्रद्धा धर्माच्या नावाने रूढी परंपरा, कर्मकांड अशा जंजाळातून बहुजन समाजाला उद्धार करण्यासाठी व्यवहारी जगाशी संबंधित वर्तमानात जगणारा धम्म दिला. आंबेडकरी अनुयायी म्हणून बुद्ध तत्त्वज्ञानाप्रमाणे आचरण करणे आपली सर्वांची जबाबदारी आहे. परंतु तसे होत नाही.

बुद्ध धम्माला जन्मातला विज्ञानवाद आपण समजून घेणार आहोत की नाही ?

बुद्धधम्मात बुद्धिप्रामाण्यवाद समजून घेणार आहोत की नाही ?

बुद्ध धम्म आतला विवेक निष्ठा समजून घेणार आहोत की नाही ?

आपण अंधश्रद्धेला मूठमाती देणार आहोत की नाही ?

याचे विविध ठिकाणच्या बुद्धविहारांमधून खरेतर प्रबोधन होणे नितांत आवश्यक आहे. काय करतो आपण ? समोरच्या हॉलमध्ये बुद्ध फुले-शाहू-आंबेडकरांचे फोटो लावतो; आतल्या घरात देवाला वास्तुशांती म्हणून सत्यनारायण घालतो ; लग्नात हळदीचा कार्यक्रम ; देवक बांधून, हातात कट्यार घेणं, मुंडावळ्या बांधून, कुलदैवतांची पूजा बांधणं, नोकरी मिळू दे म्हणून हवन व नवस करणं... हे सर्व चूक आहे हे सांगण्याची जबाबदारी कोणाची ?

बौद्ध भिकू ची जवाबदारी आहे का... आंबेडकर अनुयायांची जवाबदारी आहे का...

एका हातात 'बाबासाहेब' आणि दुसऱ्या हातात 'देव देव' हे कसे चालेल? एका हातात 'कॉम्प्युटर' आणि दुसऱ्या हातात 'देव्हारा'...हे कसे शक्य आहे.

एका हातात जीवाला जीवाचे दान माझ्या भिमान केलं आणि दुसऱ्या हातात काळुबाईची गाणी हे कसं शक्य आहे ? 'हिंदुत्ववाद' आणि 'परिवर्तनवाद' या एकाच नाण्याच्या दोन बाजू कशा होऊ शकतील ? एका हातात 'संविधान' आणि दुसऱ्या हातात 'मनुस्मृती' हे कसं शक्य आहे ?

यासाठी आम्हाला बाबासाहेब आंबेडकर नीटपणे पुन्हा पुन्हा समजून घ्यावे लागतील.

आमचा श्वास व खात असलेला घास जर बाबासाहेब असेल तर

आमची जबाबदारी नव्हे काय?

आमचे अस्तित्व, आमचा श्वास, आमचे सर्वस्व म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. समग्र जीवन आंबेडकरमय झालेले. प्रत्येक वेळा निळा झेंडा, अशोकचक्र, जयभीम हे संकेत आमच्या स्वाभिमानाच्या व ओळखीच्या खुणा ठरलेल्या असताना (शरणकुमार लिंबाळे, प्रज्ञासूर्य, पृ. १०). विशेष म्हणजे आंबेडकरी तत्वज्ञानात माणूस केंद्रबिंदू आहे. समाज त्याचा परिघ आहे. समाजवादी लोकशाही त्याची कार्यप्रणाली आहे.

समता, स्वातंत्र्य, बंधुभाव न न्याय त्याचा प्राण आहे. यामुळे आंबेडकर ही भावना सर्वव्यापी आहे.

आजचा दिन विशेष म्हणजे महामानव, राष्ट्रपुरूष व वैश्विक विचारवंत डॉ बाबासाहेब आंबेडकराचा जन्म दिवस. प्रतिवर्ष पददलितच नव्हे तर सर्व स्तरातील लोक मोठ्या ऊत्साहाने जयंती साजरा करतात. वेगवेगळे उपक्रम राबवतात. गावोगावी, तालुके, जिल्हा, शहर, वाड्या वस्त्यांवर महिनाभर जयंतीचे आयोजन करून वंदन कले जाते. कोरोनाकाळांत जमाव व संचारबंदी असल्याने माणूसच माणसाजवळ जात नव्हते. सार्वजनिक ठिकाणी एकमेकांच्या संपर्कात येणे निषिद्ध होते. किंबहुना आंबेडकरवादी नेते व संघटनानी सर्वानी घरातूनच जयंती साजरी करावी लागली होती. उपासमार होणा-यांना सढळ हातानी मदत करावी असे आवाहान केले होते. बाबासाहेबांची जयंती म्हणजे प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय. या दिवशी प्रत्येजन तन मन धनाने मानवंदना देण्यास सज्ज असतो. कोट्यावधींचा आर्थिक उलाढाल या महिण्यात होत असते. परंतू यावर्षी देशाचेच भवितव्य धोक्यात आल्याने व माणसांचे अस्तित्व संकटात आल्याने जयंतीचे काय ? लोकांचे अस्तित्व व प्रतिष्ठा अधिक महत्वाची आहे.

कोण होते हे डॉ आंबेडकर ? असं काय त्यांच्या जयंतीत आहे.... असा प्रश्न पडू शकतो. परंतु जिथं लोकशाही तिथं आंबेडकर, जिथं समाज आणि माणूस तिथं आंबेडकर, जिथं उपेक्षितांचे जगणे तिथं आंबेडकर, जिथं वंचितांचे जिणं तिथं आंबेडकर, असे सुत्र ठरले असल्याने डॉ बाबासाहेब आंबेडकरांना इतर महापुरूषांपेक्षा त्यानां अन्यन्यसाधारण महत्व आहे.

एकविसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्या देशाचे, प्रदेशाचे व जातीचे राहिले नाहीत. तेव्हा बाबासाहेबांचं जातीय अभिनिवेशातून मूल्यमापन करणे चुकीचे ठरेल. जगभरातील विद्यापीठांमधून अध्यासने, अभ्यास मंडळे व विद्यापीठे बाबासाहेबांच्या नावाने स्थापन होत आहेत. अनेक देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचे प्रतिक, सद्भावनेचा प्रतिक, समतेचे प्रतिक, आणि स्वातंत्र्याचे प्रतिक म्हणून संबोधले जात आहे. नव्हे तर, बाबासाहेबांची जयंती युनायटेड नेशन्स ऑफ ऑर्गनायझेशन कार्यालयात साजरी केली जात आहे. Pioneer of the universe असे संबोधले जात आहे.

ऑक्सफर्ड विद्यापीठाने 'चरज्ञशीि ष हिंश णपर्ळशीिश' मध्ये डॉक्टर आंबेडकरांना चौथ्या क्रमांकावर स्थान प्राप्त झाले. महाराष्ट्र राज्यात १४ एप्रिल हा दिवस अमेरिकेत 'ज्ञान दिवस' तर कॅनडामध्ये ब्रिटिश कोलंबिया मध्ये world sign of equality 'समता दिन' म्हणून साजरा केला जात आहे. तेव्हा बाबासाहेबांना एक 'वैश्विक विचारवंत' प्रकट होत आहेत. विश्वप्रणेता म्हणून पुढे आले आहेत. हे भूषणावह आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचा महासागर..... आकाशाला गवसनी घालणारा चिंतनाचा महामेरू असे वर्णन केले जाते.

समताधर्मी डॉ बाबासाहेब आंबेडकर,



कायदेतज्ञ डॉ. आंबेडकर, महामानवा डॉ. आंबेडकर, अर्थतज्ञ डॉ. आंबेडकर, समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिक्षणतज्ञ डॉ. आंबेडकर, ग्रंथलेखक डॉ. आंबेडकर, तत्त्वज्ञ डॉ.क्ष आंबेडकर, आदर्श विद्यार्थी डॉ आंबेडकर, देशभक्त डॉ. आंबेडकर, आंदोलक डॉ. आंबेडकर, जलतज्ञ डॉ. आंबेडकर, रचनाकार डॉ. आंबेडकर, पत्रकार डॉ. आंबेडकर, स्त्रीउद्धारक डॉ. आंबेडकर कायदेतज्ञ डॉ आंबेडकर, प्रशासक डॉ. आंबेडकर संसदपटू डॉ. आंबेडकर, कृषीतज्ञ डॉ. आंबेडकर इतिहास तज्ञ डॉ. आंबेडकर, धर्मचिकित्सक डॉ. आंबेडकर अशा अनेक अनंत पैलूंनी बाबासाहेब आंबेडकर पुनीत झालेले आहेत.

भारताच्या इतिहासात, बहुआयामी व्यक्तिमत्वाचा बहुधा एकमेव महापुरूष दिसून येतो. ते भारतिय राज्यघटनेचे शिल्पकार.......तर अनंत पैलू धारण करणारा महामानव म्हणून गौरव केला जातो. आतंरराष्ट्रीय स्तरांवर ज्ञानाचे प्रतिक (सिम्बॉल ऑफ नॉलेज) म्हणून त्याच्यां जीवन, कार्य व तत्वज्ञानावर साक्षेप टाकायला हवा. बाबासाहेबांनी आपल्या एकून पासष्ट वर्षाच्या आयुष्यात विविध क्षेत्रात आणि विषयात योगदान दिले आहे. अर्थतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, इतिहासतज्ञ, घटनातज्ञ, बुद्धिवान विद्यार्थी, प्राध्यापक, चतूर मुत्सद्दी, प्रभावी वक्ते, कायदेतज्ञ, अभ्यासू संसंदपटू, दृष्टे विचारवंत, प्रतिभावंत, ग्रंथकार व संशोधक अशा निरनिराळ्या भूमिकांत त्यांनी आपले प्रभूत्व सिद्ध केले आहे. समता, स्वातंत्र्य, बंधता व न्याय या मानवी मूल्यांवर आदर्श समाज निर्माण होण्याच स्वप्न पाहिल होतं व त्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले.

पाण्यासाठी सत्याग्रह करणारे आंबेडकर, मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह करणारे आंबेडकर,सत्य सांगणारे बाबासाहेब, हिंदू धर्माचा त्याग करणारे आंबेडकर, सत्य सांगणारे आंबेडकर, हिंद कोड बिल पास झाले नाही म्हणून मंत्रीपदाचा राजिनामा देणारे आंबेडकर, पाणी राष्ट्रिय संपत्ती आहे. त्याची साठवण करून पाण्याचा बहूउद्देशिय वापर व्हायला हवा म्हणून विशाल धरणांची संकलपना मांडणारे आंबेडकर, दलित-पददलितांच्या सामाजिक समता व स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणारे आंबेडकर, व्हॉईसरॉयच्या मंत्रीमंडळात मजूरमंत्रीपदाचा देणारे आंबेडकर, नेहरूच्या मंत्रीमंडळातील कायदेमंत्री असणारे आंबेडकर, भारताच्या संविधान निर्माते असणारे आंबेडकर, एकोणिशे छप्पनला समाजवादी धम्माचा स्विकार करणारे आंबेडकर, धम्माचा मुख्य हेतू जगाची पुनर्रचना करणे हे सांगणारे आंबेडकर, समाजवादी चिंतनाचा पाया रचणारे आंबेडकर... आपणास संपूर्णपणे समजावून घ्यावे लागतील. अनुषंगाने बाबासाहेबाच्या समग्र जीवन व कार्याकडे दृष्टिक्षेप टाकावा लागेल.

जगाच्या पाठीवर कुठेही एका व्यक्तीच्या अनुषंगाने इतक्या मोठ्या प्रमाणात गौरव व सन्मान होतो. एका व्यक्ती विचारावर व्यापक दृष्टीने सामाजिक अभिसरण होते. एक वैचारिक घुसळण होते. एक योग्य दिशा माणसाला प्राप्त होते. वैश्विक दिशेकडे वाटचाल दिसते. असे कधी घडत नाही. इतर महापुरूषांच्या बाबतीत घडत नाही. परंतू आंबेडकर त्याला अपवाद आहेत. यावरून असे दिसून येते कि, डॉ आंबेडकरांना एक प्रकारचे अलौकिकत्व लाभले आहे. एक विभूतीमत्व जाणवते. इतकी आंबेडकरांची प्रतिमा वंचित समूहाच्या मनात खोलवर रूजली आहे.

आजच्या अभ्याकांना कालसापेक्ष अभ्यास करता यावा यासाठी विश्विसाहार्य चरित्रकाराची आवश्यता असते. जीवनपट खात्रिलाय करित्या लिहून ठेवला. याक्षणी आंबेडकरांची रोमहर्षक जीवनकथेचे वर्णन करताना प्रसिद्ध चरित्रकार धनंजय कीर म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवाच्या प्रतिष्ठेकरिता लढणारा योद्धा होते. ते पददलितांचे त्राता होते. या देशातील किंवा परदेशातील कोणत्याही माणसाची आंबेडकरांशी तुलना होऊ शकणार नाही. इतके त्यांचे जीवन मनोवेधक, अलौकिक, अनेकविध आणि अद्भुत होते. उकिरड्यावर जन्माला येणे, अस्पृश्य म्हणून आयुष्याला आरंभ करणे, बालवयात महारोग्याप्रमाणेवाळीत टकण्यात येणे आणि सर्व तारूण्यात समाजापासून झिडकारण्यात येणे; केशकर्तनालये, अपाहारगृहे, वसतीगृहे, देवळे, सरकारी कार्यालये यातून पावलोपावलीअपमान होऊन गचांडी मिळणे हा आयुष्यातला कटू अनुभव आहे.

आंबेडकरांचा त्यावेळी कसा उदरनिर्वाह करत असत याचे वर्णन करतांना कीर यांनी असे नमूद करतात की, नातलगाच्या जेवनाचे डबे नेणे, जगातील प्रसिद्ध विद्यापीठांतून तडफडत अभ्यास करणे, आपले आयुष्य विद्यार्जनासाठी व्यतीत करणे, कधी हातात शास्त्रे घेऊन तरकधी शस्त्र घेऊन आयुष्यातील पाय-यालढत लढत वर चढणे; पाठीशी कुटुंबाचे धन नाही, राजकारणात राजकिय वारशाचा आधार नाही आणि तरीही कट्टर राजकिय विरोधाला आणि संकटाना न जुमानता देशाच्या प्रथम श्रेणीच्या पुरूषांत लौकिक मिळविणे ही गोष्ट खरोखरच असामान्य आणि भुषणावह आहे

डॉ आंबेडकरांनी देशाला काय दिले ?

दगडाला देव समणाऱ्या हिंदू संस्कृतीत नाहीस झालेलं माणसाच माणूसपण मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी समानतेच्या संघर्षाची देनगी इथल्या अस्पृश्य भारताला दिली.

जीवनभर त्यांनी सामाजिक लढाईची दिशा 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा जनजागृतीचा संदेश इथल्या अस्पृश्य भारताला दिला.

२० जूलै १९४२ रोजी ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या समारोपिय भाषणात डॉ आंबेडकरांनी पंचसूत्रीच सांगितली आहे. १) शिक्षित व्हा २) चळवळ करा (लढा उभारा) ३)संघटित व्हा ४) आत्मविश्वास बाळगा आणि ५) कधीही धीर सोडू नका ही पंचसूत्री पददलितांच्या भवितव्याचा जाहिरनामा होय.

कोणत्याही क्षणी संतूलन ढळू न देणे. आपली बौद्धिक क्षमता वाढविणे हा पर्याय दिला. हे आजच्या काळात अतिशय योग्य संदेश दिसून येतो. कोणत्याही आपत्तीला संयम, सकारात्मता, समन्वय व सहकार्याने तोंड देणे नितांत आवश्यक आहे.

आंबेडकरांनी आपली संपूर्ण हयात समता स्वातंत्र्य, बधुता आणि न्याय तत्वासाठी घालविली आहे. त्याच्या १९३६ च्या Annihilation of Caste पासून ते १९५६ च्या Budha his Dhamma पर्यंतचा ग्रंथप्रवास केला तर प्रत्येक पानापानावर समता, व्यक्तिस्वातंत्र्य, व सहानुभूती व न्याय या तत्वाचे समर्थन करताना दिसून येतात. डॉ आंबेडकरांचे स्वातंत्र्य विषयीचे तत्वज्ञान अधिक सखोल, मुलगामी आणि सर्वव्यापी आहे.

ज्यांनी या देशात जाती, धर्म भेदांचे थोतांड निर्माण केले त्या समाजव्यवस्थे विरूद्ध बाबासाहेबांनी बंड पुकारले. इथला धर्मग्रंथ, पुरोहितशाही, मोक्ष, आत्मा, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, म्हणजे वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था निर्माण करणाऱ्या संकलपनांच्या मूळावरच बाबासाहेबांनी घाव घातले. बाबासाहेबांनी भाकरीसाठी संघर्ष केला नाही. इथल्या कष्टकऱ्यांना, उपेक्षितांना, वंचितांना, शोषितांना, पददलितांना सामाजिक समानता आणि स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मानवमुक्तीचे लढे त्यांनी लढले आहेत.

**यासाठी बाबासाहेबांनी मोर्चे व सत्याग्रह केले.**

हे वास्तव व मनुस्मृति दहन (१९२७); बहिष्कृत हितकारिणी सभाची स्थापना(१९२८); महाडचा सत्याग्रह; पुणे येथील पर्वतीचा सत्याग्रह (१९२९); नाशिकचा काळाराम मंदिरप्रवेश (१९३०); पददलितांच्या हक्क संरक्षणासाठीची निवेदने (१९३०-३१, १९३३); मुखेडचा ग्रंथ समाप्तीचा सत्याग्रह (१९३२) आणि पुणे करार; येवला येथिल धर्मांतर घोषणा (१९३५); मजूर पक्ष स्थापनेची भूमिका (१९३६); ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना(१९४२); तदनंतर लखनऊ, कानपूर व नागपूर येथिल लाक्षणिक सत्याग्रह आदी प्रंसगातून बाबासाहेबांनी चळवळीला हिंसाचाराचा थारा दिला नाही. माणसाच्या न्याय हक्काची मागणी करताना दिसतात. अतिशय रचनात्मक, लोकशाही पद्धतीने, रक्ताचा एक थेंभ न सांडता आदोलने यशस्वी केली.

■ थ्युसिडीसने तुम्ही आमचे मालक होणे हे तुमच्या फायद्याचे असेल परंतू आम्ही तुमचे गुलाम होणे हे आमच्या फायद्याचे कसे असू शकेल या एकाच प्रश्नावर बाबासाहेब आंबेडकरांनी संबंध चळवळ उभी केली.

■ लोकशाही समाजवादाची मांडणी व कार्यक्रभ बाबासाहेबांनी दिला. सामूदायिक शेतीचा प्रयोग, जमाणीचे राष्ट्रियिकरण, पाणी व जंगलाचे राष्ट्रियिकरण, अवजड ऊद्योगाचे राष्ट्रियिकरण, या लोककल्याणकारी संकलपना मांडल्या.

■ समाजवादी धम्माचा स्विकार करून धम्म क्रांती केली. एकूनच आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनातीलअभ्याचे व चितंनाचे सार म्हणजे भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म.धम्म चळवळीला अतिशय उपयुक्त व मौलिक असा ग्रंथ दिला. मोठे योगदान.

■ 'एक व्यक्ति एक मूल्य' सिधांत दिला. कोणतेही समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी त्या समाजव्यवस्थेत लोकांची मान्यता असलेला कायदा व नीतिमत्ता याचा आधार घ्यावा लागतो. तरच खऱ्या अर्थाने आपण सामाजिक व राजकिय लोकशाही निर्माण करू शकू. अशी आंबेडकरांची धारणा होती. आपण शोषित, पिडीत, महिला, आदिवासी, दलित, भटके विमुक्त आदी समाज घटाकांना मूलभूत अधिकार प्राप्त झाला. ही त्यांची अभूतपूर्व योगदान व कामगिरी.

■ भारतिय संविधानाची देनगी महत्वाची. संविधान लिहिण्यासाठी बाबासाहेबांनी आपली बुद्धी, आणि अविश्रांत परिश्रम करून घटना देशाला अर्पण केली. संविधान सभेत संविधानाच्या प्रत्येक कलमांवर, संकलपना, विश्लेशन व टीकाकारांना दिलेली समर्पक ऊत्तरे म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला 'संविधानवाद' होय. तो आपण नीटपणे समजून घेऊन प्रभावी अंभलबजावणी व्हायला हवी.

■ 'राष्ट्राचे भवितव्य निर्धारित करित असताना लोकांची प्रतिष्ठा, नेत्यांची प्रतिष्ठा, पक्षाची प्रतिष्ठा या बाबीना कोणतेही मुल्य नसते. देशाच्या भवितव्याचा विचार हाच सर्वतोपरी व्हावा' ही खरी संविधांनामागची खरी भूमिका आहे.

आंबेडकरांनी लोकशाहीची व्याख्या विकसित केली. वाल्टर बेगसाट, अब्राहम लिंकन यांच्या रांगेत आंबेडकरांची गणना. डॉ आंबेडकर म्हणतात, रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारी बदल घडवून आणणा-या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पद्धतीस लोकशाही म्हणतात'.

■ १९४२-१९४६ या काळात व्हाईसरॉय मंत्रीमंडळात 'मजूरमंत्री' त्यांचे कडे वीज, पाठबंधारे, दळवळण , रस्ते व वहातूक , आणि कृषी खात्याचा भार सोपविण्यात आला होता. त्यावेळी आंबेडकरांनी देशाच्या विकासाच्या संकलपना व प्रकल्प राबविले.

अ) देशपातळीवर पहिले पाणी व वीज धोरण ठरविण्यात आले.

ब) देशात प्रथम बहुउद्देशिय नदीखोए विकास प्रकल्प राबविण्यात आला.

क) Central Waterways, Navigation Irrigation Commission (CWINC); Central Technical Electricity Board

या टेक्निकल संस्थांची निर्मीती करण्यात आली. दामोदर नदीखोरे प्रकल्प, हिराकूड धरण प्रकल्प सोन नदीप्रकल्प आणि चंबळ नदीच्या पठारावरील प्राधिकरणाची स्थापना बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झाली. त्यावेळी डॉ आंबेडकराच्या सोबत सर विश्वेश्वरय्या, डॉ मेघनाद सहा, डॉ. ए. एन खोसला, डॉ. के. एल राव, हरकिशन मेहताब, मान सिंग, बी एल सबरवाल, आर एफ रसेल, डी. एल मुजूमदार इ. शास्त्रज्ञ व इंजिनियर काम करत होते.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, प्रथम आपण समग्र आंबेडकर वाचला पाहिजे. आंबेडकराचा तत्व विचार ग्रहन करून पचवून घेतल्याशिवाय त्यांची विचारण्णालीची उकल करता येत नाही. कोणत्याही ग्रंथातला आंबेडकर वाचताना त्यांचे सोबत भगवान बुद्ध, संत कबी, महात्मा फुले या महापुरूषासोबत उभे राहाताना ते दिसून येतात. विशेष म्हणजे विचार संपला की कृतीची प्रेरणाही संपतात. परंतू आंबेडकरांच्या बाबतीत घडत नाही. त्यानी पुरस्कार केलेले मानवी मुल्ये समता, स्वातंत्र्य, बधुता व न्याय दिपस्थंभाप्रमाणे उभी आहेत. लोकशाहीच्या रूपांनी ते जिवंत आहेत. विज्ञानाची व मानवतावादाची उपेक्षा करू नये.

**संदर्भ सूची व तळटिपा :**

१. लिंबाळे, शरणकुमार. प्रज्ञासूर्य. दिलिपराज प्रकाशन, पुणे, २००७. पृ. १०.

२. गायकवाड, दत्तात्रय. जलतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेठ मिशन प्रकाशन, औरंगाबाद २०१६, पृ. २८

३. कीर, धनंजय डॉ. बाबासाहेब आंबेडकर. पॉप्युलर प्रकाशन, मुबंई. चौथी सुधारित आवृत्ती २००६, पृ. ५८०-५८१.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ. संपा. दया पवार व इतर. महाराष्ट्र राज्य साहित् आणि संस्कृती मंडळ, मुबंई प्रथमावृत्त १९९३, संपादकिय निवेदन. पृ. ८

५. Dr. BBSHEB AMBEDKR WRITING ND SPEECHES, ED. VSNT MOON VOL 18 PRT -2, PP 419-420

६. डॉ बाबासाहेब आंबेडकरभाषणे आणि विचार खंड -५: संविधान, संपा. धनराज दाहट. षंकेत प्रकाशन, नागपूर; २०११. पृ. १४.

७. Dr. BBSHEB AMBEDKR WRITING ND SPEECHES, ED. VSNT MOON VOL 3; PP 328 Cited by Dhanraj Dahat in डॉ. बाबासाहेब आंबेडकरभाषणे आणि विचार खंड -५: संविधान पृ. १५

८. mbedkar's Contribution to Water Resources, Central Water Commission. New Delhi; 1993. P 13.

Dr. BBSHEB AMBEDKR WRITING ND SPEECHES, ED. VSNT MOON VOL 10.

See Also

Thorat, Sukhdeo, Ambedkar's Role in Economic Planning Water Policy, Shipra Publications, Delhi

गायकवाड, दत्तात्रय. बहुद्देशिय नदीखोरे विकास आणि आंबेडकरांची जलनिती, स्वंयदिप प्रकाशन, पुणे

Gaikwad, Dattatray. Treatises on mbedkar's works on Sustainable Development Indian River Basin, Swayamdeep Publication, Pune; 2016 Gaikwad, Dattatray, An Exploratory study of contribution of Dr mbedkar : Multi-purpose Mahanadi River Valley Development. swatha, 4(1), Jan-Mar 2010

९. प्रस्तूत अभ्यासक केंद्रिय जल आणि विद्युत केंद्र, खडकवासला, पुणे येथे माजी 'ग्रंथालय माहिती अधिकारी' पदावर कार्यरत होते. सहा विद्यार्थी mp3 व चार विद्यार्थ्यांना पीएचडीचे को-गाईड म्हणून मार्गदर्शन, एकून २४ ग्रंथ व १०० पेक्षा अधिक लेख प्रकाशित, उस्मानाबाद जिल्ह्यातील पाच बुद्ध विहारांना बुद्धमूर्ती भेट, साठ विद्यार्थ्यांना गेली पंधरा वर्षे शालेय साहित्याचे वितरण, आज पर्यंत २१ मान्यवरांना समीक्षा जीवन गौरव पुरस्कार प्रदान केले असून ..... सन २०२२ एक दिवशी आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे आयोजन, २०२५ ला आंबेडकरवादी कवी संमेलन आयोजित केले, असून विविध प्रसंगी आंबेडकर चळवळीतील विविध विषयावर लेख अनेक भाषणे दिली आहेत. विशेष म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जल आणि विद्युत क्षेत्रातील योगदान

संशोधनात्मक एकून चार व ग्रंथाचे दोन ग्रंथाचे ललित लेखन सादरीकरण केले आहे. सामाजिक व सांस्कृतिक, कार्यक्रमाचे आयोजन व सहभाग असतो.

**- डॉ. दत्तात्रय गायकवाड,**
**मोबाईल : ९८६०५९१३०५**

# महापुरुषांचे विचार आचरणात आणले पाहिजे : सुनिल वारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाला प्राधान्य दिले त्यांनी महिला व अस्पृश्यासाठी पहिली शाळा पुण्यात सुरू केली . भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला . स्वतःचे कुटुंब व समाज आणि तत्कालीन व्यवस्थेविरुध्द बंड केले . छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी शोधून काढली.ते कर्ते समाज सुधारक होते. महापुरुषांचे विचार आपल्यासाठी प्रेरणादायी असून त्यांचे विचार आपण आचरणात आणले पाहिजेत असे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन प्रसंगी बोलतांना व्यक्त केले .

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त समता सप्ताह कार्यक्रमांतर्गत दिनांक ७ एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ पर्यंत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

समता भूमी फुलेवाडा, पुणे येथील स्मारक स्थळी क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस मा महासंचालक श्री वारे यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

बार्टी मुख्यालयात महापुरुषांच्या जीवनावरील मूल्यवान पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन मा. महासंचालक श्री वारे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख वृषाली शिंदे, रवींद्र, कदम उमेश सोनवणे, शुभांगी पाटील यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री




रामदास लोखंडे यांनी केले आभार श्री सुनील थोरात यांनी मनले.